MHTH310022702025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १५.११.२०२४ |
| नोंदणी तारीख | : | ३०.०१.२०२५ |
| निकाल तारीख | : | ०७.०७.२०२६ |
| कालावधी | : | ०१ व ०५ म ०८ दि |

**मिरा-भाईंदर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : डॉ. आर. के. जंगम यांचे समोर)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२५९/२०२५**
**नि. क्र.०८**

सरकार तर्फे
मिरारोड पोलीस ठाणे,
जि. ठाणे. ..... **फिर्यादी**.

**विरूद्ध**

१. इरफान अन्वर शेख,
वय — ३४ वर्ष,
रा. फिरस्ता, मिरारोड रेल्वे स्टेशन
स्कॉयवॉक, मिरारोड पुर्व. ..... **आरोपी.**

**दोषारोप: भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१७(५) प्रमाणे.**

---

सरकार पक्षातर्फे वकील : सहा. सरकारी अधिवक्ता श्रीमती तेजश्री राणे
आरोपी तर्फे वकील : श्री. के. जे. पाल

---

**न्यायनिर्णय**

(घोषित दि. ०७ जुलै, २०२६)

**०१.** प्रस्तुतच्या खटल्यामध्ये आरोपी हा भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१७(५) साठीच्या संमपरीक्षेस सामोरा गेलेला आहे.

०२. **अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे :—**

दि. १५.११.२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. ते ५.०० वा. चे सुमारास

मिरारोड पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात शॉप नं.१, फॅन्टसी टॉवर, शांतीपार्क निअर हॅप्पी होम कॉम्प्लेक्स, मिरारोड पु. ता. जि. ठाणे येथे फिर्यादी यांच्या दुकानातील रु.१२,०००/— किंमतीचे दरवाजे तुम्ही संमतीशिवाय लबाडीने चोरले असून ते यातील महिला आरोपी नामे विजयमाला इद्रजित सुरते हिने विकत घेवून ते विकले त्याबाबत फिर्यादी यांनी अज्ञात इसमाविरुध्द तक्रार दाखल केली. त्या तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हा रजिस्टर क्र. ३५६/२०२४, मिरारोड पोलीस ठाणे येथे या गुन्हयाचा तपास करीत असतांना सदरचा गुन्हा आरोपी नामे इरफान अन्वर शेख याने केल्याचे तपासात निष्पन्न झाले, म्हणून तपासी अधिकारी संदिप गिरमे, पो.हवा—०६२६७, नेम. मिरारोड पोलीस स्टेशन यांनी आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१७(५) च्या गुन्हयाकरिता दोषारोपपत्र दाखल करण्यापावेतो पुरावा निष्पन्न झाल्याने आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** आरोपी नामे इरफान अन्वर शेख हा न्यायिक कोठडीत असून आजरोजी त्यास न्यायालयात कल्याण मध्यवर्ती कारागृह मधून व्ही.सी.व्दारे हजर केले. त्यावेळी आरोपीने विनंती केली की, त्याला या खटल्यामध्ये गुन्हा कबुल आहे. आरोपीस त्यावरील दोषारोप भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१७(५) अन्वये दोषारोप वाचून दाखवून समजावून सांगितला असता त्यास गुन्हा कबूल असल्याचे (नि.क्र. ७) तो सांगतो. सदरचा गुन्हा शिक्षापात्र असून त्यास सश्रम कारावासाची शिक्षा होवू शकते असे त्यास समजावून सांगितले. तरीही त्याने त्यास गुन्हा कबूल असल्याचे सांगितले.

**०४.** प्रस्तुत प्रकरणात आरोपीने गु.र.क्र.३५६/२०२४ मिरारोड पोलीस स्टेशन याय गुन्हयातील जप्त मुद्देमाल फिर्यादी यांच्या दुकानातील रु.१२,०००/— किंमतीचे दरवाजे फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीचे उद्देशाने चोरी करुन नेले हे अभियोग पक्षाचे आरोप आरोपीने नाकारलेले नाही. एकंदरीत, आरोपी यास आजरोजी न्यायालयात हजर केले असता, आरोपीने कथन केलेली कथने तसेच आरोपी हा स्वेच्छेने गुन्हा कबूल करत असल्याचे दिसून येत आहे. आरोपीस दोषारोपामधील कथने मान्य व

कबूल असल्याने आरोपीने जाणीवपुर्वक चोरी केली ही बाब सिध्द झालेली आहे. आरोपीने असा युक्तिवाद केला की, त्याच्यावर त्याच्या कुटूंबाची जबाबदारी आहे. त्यामुळे त्यास कमीत कमी शिक्षा द्यावी अशी विनंती केली. आरोपीचे वकील श्री के. जे. पाल यांनी देखील कमीत कमी शिक्षेबाबत युक्तीवाद केला आहे.

**०५.** सहायक सरकारी अधिवक्ता यांनी आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली.

**०६.** आरोपीस दोषारोपमधील कथने मान्य व कबूल असल्याने आरोपीने जाणीवपुर्वक चोरी केली ही बाब सिध्द झालेली आहे. आरोपीला शिक्षा देताना गुन्हेगाराची परिवेक्षा अधिनियम, १९५८ चे कलम ३ किंवा ४ अन्वये असलेल्या तरतुदींचा लाभ देता येईल किंवा नाही ही बाब विचारात घ्यावी लागेल. भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१७(५) अन्वयेच्या गुन्हयाकरीता ०३ वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या दोन्ही प्रकारच्या कारावासाच्या पैकी एका कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा द्यावयाची तरतूद आहे.

**०७.** एकंदरीत, आरोपीस कमीत कमी शिक्षा दिली गेल्यास आरोपी सदर बाबीचा गैरफायदा घेवून पुर्वीप्रमाणे वारंवार गुन्हे करीत राहील. त्यामुळे केवळ आरोपी गुन्हा कबूल करीत आहे म्हणून आरोपीस कमी शिक्षा देणे न्यायोचित होणार नाही. आरोपीवरील गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आहे. अशा परिस्थितीत आरोपीची पार्श्वभुमी, गुन्हयाचे स्वरुप यावरुन आरोपी अपराधी परिवेक्षा अधिनियम, कलम १९५८ चे कलम ३ किंवा ४ चा फायदा मिळणेस पात्र ठरत नाही. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :—

## आदेश

**०१.** आरोपी क्र.१ नामे इरफान अन्वर शेख यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २५२ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१७(५) च्या गुन्हयाकरिता दोषी ठरविण्यात येत आहे.

**०२.** आरोपीस ०१ वर्ष ७ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व दंड रक्कम रुपये ५,०००/— ठोठाविण्यात येत आहे. आरोपीने दंड न भरल्यास त्याकरीता १ महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

**०३.** आरोपीने संपरिक्षा सुरू असताना या खटल्यांमध्ये तुरूंगात घालवलेल्या कालावधीची त्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४६८ प्रमाणे शिक्षेमधून सुट देण्यात येत आहे.

**०४.** आरोपीला न्यायनिर्णयाची एक प्रत विनामुल्य देण्यात यावी.

**०५.** प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुददेमाल हा अपील कालावधीनंतर कायदेशीर हक्कदारास देण्यात यावे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुददेमालाचा तात्पुरत्या स्वरुपाचा ताबा दिला गेला असल्यास अपील कालावधीनंतर सदर ताबा कायम करण्यात येतो.

**०६.** तुरूंगाधिकारी, कल्याण मध्यवर्ती कारागृह, कल्याण यांना कळविण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषित करून संगणकमुद्रीत करण्यात आला.)

JANGAM RAGINI
Digitally signed by JANGAM RAGINI
Date: 2026.07.07 17:46:30 +0530

मिरा-भाईंदर
दि. ०७.०७.२०२६

( डॉ. आर. के. जंगम )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
मिरा-भाईंदर

**<u>दाखला</u>**

दाखल देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : वाय. बी. कराड |
| न्यायालयाचे नाव | : दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, मिरा—भाईंदर |
| न्यायनिर्णय जाहीर केलेची तारीख | : ०७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : ०७.०७.२०२६ |